International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# प्राचार्य. पी. बी.पाटील: इतिहास लेखन विषयक विचार व कार्य

**प्रा.सुषमा विलासराव जाधव**
*इतिहास विभाग,*
*वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द. ता. वाळवा जि. सांगली*
*Corresponding Author - प्रा.सुषमा विलासराव जाधव*
**DOI - 10.5281/zenodo.10951979**

प्राचार्य पी बी पाटील हे इतिहासाचे गाढे अभ्यासक होते त्यांचा इतिहासाचा व्यासंग दांडगा होता. इतिहासकारांच्या खोट्या आणि अवास्तव दाव्यांना ते सप्रमाण खोडून काढतात महाराष्ट्राच्या इतिहासाची झालेली हेरसांड त्यांना बघवत नाही. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची केलेली मोडतोड त्यांना मान्य नाही. यावरून ते अनेक इतिहासकारांचे वाभाडे काढतात. अनेक इतिहासकारांनी विकृत अवास्तव आणि पूर्वग्रहदूषित इतिहास लिहून ठेवलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा एवढा महान आणि गौरवशाली असलेला इतिहास बदलला जातो, पण आम्ही त्याबद्दल फारसे सजग नाहीत. शिवछत्रपतींचा इतिहास म्हणजे आमचा वैभवशाली वारसा आहे, पण या वारशाची इतिहासकारांनी मोठी हेळसांड केलेली आहे. हे पी. बी पाटील यांनी आपल्या लेखनातून आणि भाषणांमधून दाखवून दिले आहे. या हेळसांडीला मराठी माणूसच कारणीभूत असल्याचे मत ते व्यक्त करतात. ते म्हणतात "याचे कारण जन्म, जग, यासंबंधी आमच्या उदास, बेफिकीर भ्रामक मनोवृत्तीत आहे. हे सारे जग मिथ्या आहे. क्षणभंगुर आहे. मायाजाल आहे. हा जन्मच खोटा आहे. मग त्याची फिकीर करण्याचे कारण काय? आणि मग मरून गेलेल्या लोकांची, होऊन गेलेल्या कामाची आठवण जपण्याची गरजच काय? म्हणून आम्ही इतिहासाकडे पाठ फिरवूनच पिढ्यानपिढ्या जगलो. इतिहास लिहिण्याची जाणीव आम्ही कधी दाखवली नाही. त्यासंबंधी आम्ही ज्या प्रथा सांभाळल्या त्या म्हणजे कथा गोष्टी सांगायच्या. पोथ्या लिहायच्या. पोवाडे गायचे. पुराण कथा सांगितल्या. सारख्या वाड-वडिलांच्या गोष्टी सांगायच्या. इतिहास म्हणून काही शास्त्र आहे आणि ते समाजधारणेला अत्यावश्यक असते आणि ते जपून ठेवले पाहिजे, त्याची काही गरजच आम्हाला नव्हती. ऐकीव दंत कथा आठवतील तशा सांगणं, रंगवून सांगणं आणि ऐकण्याचच आम्ही आमचं एक शास्त्र तयार केलं. धर्मशास्त्रामध्ये श्रुती आणि स्मृती अशी शास्त्रे आहेत. श्रुती म्हणजे ऐकलेलं. स्मृती म्हणजे आठवेल ते. तेवढेच घेऊन आम्ही हवे तसे

जगत आलो. आमचे शास्त्री, पंडित आणि परकीयांचे शास्त्रज्ञ, संशोधक यात जसा फरक आहे. तसाच फरक आमची पोथ्या, पुराने आणि इतिहास यामध्ये आहे.''**1** आम्हाला इतिहास आणि पोथ्या-पुराणांतील फरकच निटसा कळलेला नाही. हे पी. बी. पाटील तळमळीने सांगतात. पोथ्या पुराणांतील चमत्कारिक गोष्टी या इतिहास नसून आमचा खरा इतिहास मात्र येथील इतिहासकारांनी काळवंडून टाकलेला आहे असे ते सांगतात. या परिस्थितीला आम्ही स्वत:च जबाबदार असल्याचे ही ते स्पष्टपणे नमूद करतात.

आम्ही पोथ्या पुराणांनाच आमचा इतिहास मानत आलो आहोत. ही खंत पी. बी. पाटील व्यक्त करतात. छत्रपती शिवाजी महाराजांना ते स्वतःची प्रेरणा मानतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास त्यांना खूप मोलाचा वाटतो. या इतिहासावर त्यांनी एक पोवाडा देखील लिहिलेला आहे. तो असा-

''जरी हिमालयाची करून लेखणी खास
सागरात शाही बुडवून इंद्रधनुष
आणि जगी लिहायला बसला जरी जगदीश
तरी नाही लिहून संपायचा शिवाजी राजांचा दिव्य इतिहास जी॥''**2**

कितीही खटाटोप केले आणि केवढाही शब्दप्रपंच मांडला तरी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास लिहून पूर्ण होणार नाही. असे पी. बी. पाटील यांना वाटते.

आमच्याकडे अतिरंजीत इतिहास लिहिण्याची एक पद्धती रूढ झाली होती. ज्यांच्या विषयी लिहायचे त्यांची एकांगी स्तुती करायची किंवा जो शत्रू आहे त्याची अधिकची निंदानालस्ती करून, त्याचे राक्षसी स्वरूप रंगवायचे. त्यामुळे आमच्या इतिहास लेखनात वास्तवतेपेक्षा विकृतीच अधिक भरली आहे. याविषयी पी. बी. पाटील म्हणतात की, ''महाराष्ट्राचे बहुतेक सगळे इतिहास लेखन अशा विकृतीने भरलेले आहे. महाराष्ट्राचा वास्तवदर्शी इतिहास आम्हाला अजून नीटपणे कुणी सांगत नाही. शिवकालाचा आणि पेशवाईचा इतिहास म्हणून आपणाला जो शिकवला गेला तो सुद्धा असा विकृतीने भरलेलाच आहे. त्या विकृतीची कारणे शोधून ती खऱ्या इतिहासाबरोबर महाराष्ट्र पुढे मांडण्याची गरज आहे.'**3** काही इतिहासकारांनी मात्र अत्यंत प्रामाणिकपणे आणि कष्टाने शिवरायांचा इतिहास लिहिण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या कामाची वाखाननी करताना पी. बी. पाटील म्हणतात की, ''कोल्हापूरचे आपले डॉ. जयसिंगराव पवार आज त्या दृष्टीने फार चांगले काम करीत आहेत. त्यांनी जी इतिहास संशोधनाची संस्था चालविली आहे, तिची मूळ प्रेरणा स्वर्गीय डॉ. अप्पासो पवार यांनी दिलेली आहे आणि ते काम जयसिंगराव पवार फार हिंरिरीने आणि जबाबदारीने चालवीत आहेत.''4

पी. बी. पाटील यांनी खऱ्या इतिहासाबरोबर तो खोटा करून सांगणाऱ्या इतिहासकारांची कुडलीच काढली आहे. ते म्हणतात ''आपण आजपर्यंत महाराष्ट्राचा इतिहास म्हणून जो शीकलो त्यावर तीन मोठ्या इतिहासकारांचा मोठा प्रभाव आहे. त्यांनी जे

लिहिलं तेच पुढे इतिहास म्हणून सांगण्यात येऊ लागलं. त्यातले एक सातारा दरबारातील इंग्रज प्रेसिडेंट ग्रँड डफ. त्यांनी इंग्रजीतून महाराष्ट्राचा इतिहास म्हणून लेखन केले आहे. ग्रँड डफचा संदर्भ काही जण घेतात. त्यानंतर न्यायमूर्ती रानडे यांनी मराठा साम्राज्याचा इतिहास म्हणून ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. तो खरं म्हणजे संशोधन ग्रंथ नसून न्यायमूर्तींनी इतिहासावर नऊ दहा व्याख्याने दिली होती, त्या व्याख्यानांसाठी त्यांनी जी टाचणं-टिपणं काढली होती त्यावरून तो त्यांचा ग्रंथ रचला आहे. या ग्रंथाचाही काही प्रभाव नंतरच्या इतिहासलेखनावर झाला आहे आणि तिसरा संदर्भ जो आहे तो रियासतकार सर देसाई यांनी महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधी जी मराठी, मोडी व इतर दप्तरं मिळाली त्यांचे संकलन करून जी इतिहासाची साधने एकत्रित केली त्यांचा संदर्भ आहे. मराठ्यांविषयी इतिहास लेखनाचा बराच संदर्भ या तिघांच्या लिखाणातून घेतला जातो. आता या तिघात थोर इतिहासकारांच्या लिखाणाची खूप मोठी अवास्तवता आणि विकृती आहे.''**5** हे पी. बी. पाटील सप्रमाण सिद्ध करतात. इतिहासा संशोधनाची एक दृष्टी असावी लागते मात्र तीची कमतरता इथे जाणवते.

शिवकाळाच्या इतिहासाची मोडतोड होण्याचे कारण सांगताना पी. बी. पाटील म्हणतात की, ''हे असे का झाले कारण या तिन्ही लेखकांनी ज्या साधनांचा उपयोग केला किंवा संदर्भ घेतला ती साधनेच मुळात अवास्तवता आणि विकृती यांनी भरलेली आहेत. हे तिघेही लेखक काही शिवकाळात नव्हते. शिवकाल जाऊन, पेशवाई संपून, इंग्रजी राजवट इथेच स्थिरावल्यावर या तिघांनी आपले लेखन केले आहे आणि त्या लेखनासाठी त्यांनी जो आधार घेतला आहे, तो दहा-बारा बखरींचा... या बखरींपैकी एक सभासदाची बखर सोडली तर बाकीच्या सर्व बखरी पानिपतच्या युद्धानंतर पराभूत पेशवाईतल्या बारभाईंच्या कारभाराच्या गोंधळ कालीन लिहिलेल्या आहेत. आणि त्यातील काहींच्या प्रस्तावनेत स्पष्टपणे म्हटले आहे की, नाना फडणीसांच्या सांगण्याप्रमाणे या बखरी लिहिल्या आहेत. पहिली सभासदाची बखर तेवढी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर 14-15 वर्षांनी लिहिली आहे. बाकीच्या सर्व बखरी त्यानंतर शंभर सव्वाशे वर्षांनी तत्कालीन पेशवे राजवटीला हव्या होत्या तशा लिहिल्या आहेत. त्यातील काही मूळ हस्तलिखिताच्या प्रती फ्रान्सच्या संग्रहालयात सापडल्या आहेत. काही गहाळही केल्या असण्याची शक्यता आहे. या बखरींचा संदर्भ घेऊन जो इतिहास लिहिला गेला, आम्हाला शिकवला गेला त्यामुळेच शिवकाल आणि पेशवाई याबद्दल अनेक अवास्तव व विकृत गोष्टी घुसडल्या गेल्या आहेत.'**6** या घुसडवलेल्या गोष्टींची सत्यता तपासणे गरजेचे आहे. शिवकाळात फारसा इतिहास नोंदवला गेला नाही. पेशवे काळात बराचसा नोंदवला गेला, पण त्यात अवास्तवता, धन्याची फाजील स्तुती आणि शत्रुची पराकोटीची नालस्ती यामुळे तो अविश्वसनीय होऊन बसला आहे.

इंग्रजी राजवटीच्या काळात जो इतिहास लिहिला गेला तोही इंग्रजांना पाहिजे तसा लिहिला गेला. त्यांनी छत्रपतींचे ध्येय कर्तुत्व वास्तव स्वरूपात पुढे येऊ नये अशीच काळजी घेतलेली आहे. कारण शिवछत्रपती कायम परकीय शक्तींना पाताळी गाडत असत. हा इतिहास समजला तर इंग्रजांची राज भारतावरील राजसत्ता धोक्यात आली असती. ‘‘परकीयांच्या गुलामी विरुद्ध मोठ्या शौर्य, धैर्य आणि मुत्सद्दीपनाने लढून ज्यांनी स्वातंत्र्याचा, स्वराज्याचा तेजस्वी इतिहास निर्माण केला त्यांच्याच नावाचा जयजयकार करीत ब्रिटिशांच्या सैन्यदाला चाकरी करणारे आणि त्या परकीय गुलामीसाठी प्राण देणाऱ्या आणि घेणाऱ्या मराठी सैन्याच्या तुकड्या त्यांनी बाळगल्या. छत्रपतींच्या राजधानीची रायगडची अवस्था पेशवाईत आणि इंग्रजी आमदनित कशी करण्यात आली हे ही त्या कुटीलपणाचे एक उदाहरणच आहे. शिवाजी महाराजांची समाधी सुद्धा इतक्या उपेक्षितपणे आणि कृतघ्नपणे विस्मृतीत गाडली गेली की त्याची कुणाला आठवण सुद्धा राहिली नाही.’’7 पेशव्यांनी ज्या स्वराज्याच्या राजसत्तेचा उपभोग घेतला त्या स्वराज्याचे संस्थापक छत्रपी शिवाजी महाराजांचा किर्तीवंत इतिहास जाणूनबूजून बाजूला सारण्याचे काम झाले. इथेही ब्राम्हणी कावा पी. बी. पाटील यांना दिसून येतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आधुनिक काळात पुन्हा पल्लवित करण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. त्याविषयी पी. बी. पाटील म्हणतात की, ‘‘वैराण, उपेक्षित रायगडावर डोकीएवढ्या गवतातून, झाडाझुडपांतून पडक्या इमारती, शोधत शोधत महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिल्यांदा छत्रपतींची समाधी शोधून काढली. शिवाजी महाराजांवर पोवाडे लिहिले. काही इंग्रज अभ्यासकांनी शिवाजीचा इतिहास किती भव्य, दिव्य, प्रेरणादायी आहे आणि तो वारसा तुम्ही असा का उपेक्षित ठेवता? असं सांगितल्यावर मग आमच्यातल्या काही संस्थानिकांना पुढाऱ्यांना जाग आली, पण इतिहास जगाला ज्ञात नाही. ज्योतिबा फुले यांचे नाव घेतले जात नाही. सांगितलं जातं, लोकमान्य टिळकांनी शिवजयंती साजरी करण्याची प्रथा पाडून महाराष्ट्राला शिवाजीची आठवण करून दिली, परंतु टिळकांच्याही अगोदर 45 वर्ष महात्मा ज्योतिबा फुले यांनी विस्मृतीत नेऊन टाकलेल्या शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली. पोवाडे लिहिले पडकी समाधी दुरुस्त केली. हे सांगण्याचे मात्र टाळले जाते. अर्थात ज्या लेखणी बहाद्दरांनी पुढे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मृत्यूचीही बातमी छापण्यास नकार दिला त्यांच्या कोत्या मनोवृत्तीकडून वेगळया अपेक्षा तरी कशा करायच्या?’’**8** आमचा इतिहासा ब्राम्हणी वर्चस्वात आहे. एखाद्या बहुजन व्यक्तीने केलेले कार्य इतिहासात कधी नोंदवलेच गेले नाही. रयतेचे राज्य स्थापन करणारे शिवछत्रपती यांना या ब्राम्हणांकडून शुद्र म्हणून हिनवले गेले. त्यांचा इतिहास जगासमोर आनणाऱ्या महात्मा फुलेंची नोंद देखील या इतिहासकारांना घ्यावीसी वाटली नाही. टिळक मात्र ब्राम्हण आहेत म्हणून अगदी अर्ध्या शतकानंतर फुलेंनी केलेले कार्य टिळकांच्या नावे

नोंदवले जाते. ही इतिहासातील बेईमानी पी. बी. पाटील यांना खटकते.

इतिहासलेखनातील हे जाती वर्चस्व उघडे पाडताना पी. बी. पाटील म्हणतात, ''पेशवाईत राज्यकर्त्यांनी ज्या बखरी लिहून घेतल्या. त्या पूर्णतः जाती वर्चस्वाच्या मनोवृत्तीतून लिहिलेल्या आहेत.... पेशवाईच्या पापाचे समर्थन करण्यासाठी आवश्यक असलेली अशी खोटी विकृत पार्श्वभूमी तयार करण्याच्या दुष्ट हेतूने जाणून-बुजून कथानकी थाटाच्या बखरी रचल्या गेल्या आहेत. अठराव्या शतकाच्या मध्यानंतर पाणीपत युद्धाच्या लांछनास्पद पराभवानंतर काल्पनिक कथांची आणि जाती वर्चस्वाची बाडं, बखरीच्या रूपाने तयार करून घेऊन पेशवाईतील नादान बारभाई राज्यकर्त्यांनी इतिहास म्हणून महाराष्ट्राच्या माथी मारला आहे. तोच खरा मराठ्यांचा इतिहास म्हणून संधी मिळेल तिथे अट्टहासाने सांगण्याचा निर्लज्जपणा आजही काही संभावित लेखक करताना दिसताहेत.''**9** हे विकृतीकरण अज्ञानातून, अजाणतेपणे झालेले नाही ते हेतू धरून कुटीलपणे केलेले लिखाण आहे आणि तेच महाराष्ट्राला, मराठी समाजाला फार बाधक झाले आहे. हे पी. बी. पाटील यांनी ठणकावून सांगिले आहे. आपल्या आजच्या स्वार्थासाठी छत्रपतींचे नाव वापरण्याचे धंदे बंद झाले पाहिजेत. छत्रपतींची अशी बदनामी कोणी करता कामा नये छत्रपतींचे मोठेपण कळत नसेल तर त्यांना स्वतःच्या मनातील कोतेपण चिकटवून छत्रपतींना छोटे करून जगाची दिशाभूल करू नये अशीच भूमिका पी. बी. पाटील यांनी मांडली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत विस्कळीत स्वरूपात असलेला महाराष्ट्र व मराठी माणूस ज्या पद्धतीने एकत्र केला, तसाच संयुक्त महाराष्ट्र एकत्र यावा, एकात्म व्हावा असा हेतू पी. बी. पाटील व्यक्त करतात. ते म्हणतात की, ''आपली मने जाती, धर्म, गट, पंथ इत्यादी भेदाभेदाने तडकलेली आहेत. विस्कळीत झाली आहेत. अज्ञान, दारिद्र्य, अस्पृश्यता यांनी निराश हताश, संशयित, दुरावलेली आहेत. आपला रोजचा व्यवहार अशाच प्रदूषित मनाने चाललेला असतो. अशा हतबल, दुरावलेल्या मनस्थितीत आठरा पगड जातींना रोजच्या व्यवहारात सरपटणाऱ्या मन:स्थितीतून वर उचलून स्वराज्यासाठी मरायला किंवा मारायला तयार करण्याचे महान कार्य छत्रपतींनी केले आहे. तसे ऐतिहासिक अलौकिक कार्य आजही महाराष्ट्राकडून व्हावे असाच माझा हेतू आहे.''10 सर्व महाराष्ट्र एक करायचा, भावनिक ऐक्य परिदृढ करायचे म्हणजे केलेल्या चुका, केलेली पापे मानभावीपणे किंवा कुटीलपणे झाकून ठेवायचे ही बाब पी. बी. पाटील यांना मान्य नाही. ते म्हणतात, ''आपले पाप हे पाप नाही तर ते पुण्य आहे, असे ही सांगण्याचा कोडगेपणा संभावितपणे चालू ठेवायचा असे नाही. असा निर्लज्ज संभावितपणा चालू ठेवल्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात फार वैगून्य निर्माण झाली आहेत. हिंदवी स्वराज्यासारखा काळाच्याही पुढे धावणारा उदात्त ध्येयवाद रोजच्या व्यवहारातील

कोतेपणात अडकून पडलेली मने उचलून घेऊन नवा रयतेच्या राज्याचा इतिहास घडविणारा ध्येयवाद तोडून मोडून टाकून पुन्हा जातीपातीचे, भेद, उच्च नीचता, अस्पृश्यता साऱ्या षडरिपुंनी ग्रस्त झालेली, क्षयरोगी मनस्थिती निर्माण करणारी प्रतिक्रांती महाराष्ट्रात झाली आहे. ज्याची लाज वाटावी, संताप यावा असा इतिहास शिवकालानंतर महाराष्ट्रात घडला आहे. झालेल्या घडामोडींची नीट चिकित्सा करून खरं काय? खोटं काय? हे साधार सिद्ध करून स्वीकारले पाहिजे. चूक त्याला चूक, पाप त्याला पाप, म्हणून पुन्हा तशा चुका व पापे होणार नाहीत याची खबरदारी घेऊया. जे चुकीचं पापाचं घडलं असेल ते झाकून दळून बुद्धीभेदाच्या मखमली शब्दांचे पांघरून घालून विकृतपणे खऱ्याचं खोटं आणि खोट्याला खरं ठरवणं किंवा पापाला पुण्य आणि पुण्याला पाप ठरवून तेच खरं म्हणून महाराष्ट्रापुढे ठेवणं हे महापाप आहे.''**11** हे महापाप महाराष्ट्रात झालेले आहे. मराठी बाणा असलेले शिवछत्रपतीची कारकिर्द उज्ज्वल होती. या कारकिर्दीला पुढे पेशवाईने काळवंडून टाकले. आणि ब्राम्हणी इतिहासकार मात्र त्या पेशवाईचाच उदो-उदो करत राहिले. हे ऐतिहासिक महापाप आहे असे पी. बी. पाटील यांना वाटते.

हे महापाप छत्रपती संभांजी राजांच्या इतिहास लखनातही झाल्याचे पी. बी. पाटील यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. छत्रपती संभाजी महाराजांचे जे गलिच्छ, विकृत चरित्र महाराष्ट्रापुढे गेली दोन अडीचशे वर्ष बखरीत लिहून ठेवले गेले ते अशाच एका महापापाचे उदाहरण आहे. असे सांगून पी. बी. पाटील तर्कतिर्थ जोशींचे उदाहरण देऊन सांगतात की, ''तर्कतिर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी जे लिहिले आहे, ते मी मुद्दाम तुम्हाला सांगतो. कारण ते महाराष्ट्राच्या इतिहासाच्या विकृतीकरणाशी संबंधित आहे. आजपर्यंत छत्रपती संभाजी म्हणजे दारुड्या, दूरवर्तनी, बाहेरख्याली, अत्याचारी, अनाचारी, छत्रपती शिवाजींचे स्वराज्य उध्वस्त करणारा, मंत्र-तंत्राच्या नादी लागून सद्गुनी सर कारकुणांना हत्तीच्या पायी देणारा असा, दुष्टात्मा रंगवला आहे. हे सारे भयंकर चित्र पुसून काढून खोटे ठरवून मराठ्यांच्या इतिहासात शिवाजी महाराजांच्या इतकाच मोठा महापुरुष संभाजीच्या रूपाने होऊन गेला हे साधार सिद्ध केले आहे.'' **12** ब्राम्हण कितीही झाला भ्रष्ट, तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ. या ब्राम्हणी काव्याला छेद देत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात कुटनिती करणाऱ्या ब्राम्हण कारकुनांना संभाजी महाराजांनी हत्तीच्या पायी दिले. ही खूप मोठी ऐतिहासिक घटना होती. एका जुलमी, कुटील विचाराला छत्रपती संभाजी महाराजांनी शिक्षा दिली. मात्र यामुळे ब्राम्हणांचे पित्त खवळले आणि त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांनाच इतिहासात खलनायक म्हणून चित्रित केले. हे पी. बी. पाटील यांनी सप्रमाण सिद्ध केले आहे. पी. बी. पाटील हे इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी इतिहासातील ही महापापे शोधून शिवशाही ते पेशवाई असा महाराष्ट्राच्या इतिहास लेखनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

**संदर्भसूची :**


1. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 17
2 . पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 16
3. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 17
4. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 17
5. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 18
6. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 19
7. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 120
8. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 17
9. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 121
10. पाटील पी.बी. , शिवशाही ते पेशवाई, एक आढावा,जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती,फेब्रुवारी 2017 पृष्ठ 22
11. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 22
12. पाटील पी.बी., शिवशाही ते पेशवाई, एक आढावा, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, चंद्रपूर, प्रथम आवृती, फेब्रुवारी 2017 पृष्ठ 22